## थोडक्यात...

### ॲड. नितीन ठाकरे यांना मानद डॉक्टरेट




**नाशिक ।** नाशिक बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष तसेच मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांना कायदेविषयक सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल फ्रान्स येथील थेम्स विद्यापीठ पॅरिसतर्फे मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. नवी दिल्ली येथे हॉटेल रेडिसन ब्ल्यूमध्ये पार पडलेल्या पदवीदान समारंभात डॉ. नितीन ठाकरे यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी कॉमनवेल्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रिपू रंजन शर्मा तसेच सुप्रीम कोर्टाचे ॲड. अशोक सुद शास्त्री उपस्थित होत्या.

### कार्यक्षम ज्येष्ठ नागरिक संघांना पुरस्कार

**नाशिक ।** लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे जूनपासून नाशिकसह नाशिक जिल्ह्यातील ३ ज्येष्ठ नागरिक संघांना कार्यक्षम ज्येष्ठ नागरिक संघ पुरस्कार भव्य दिव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत देणार असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष रंजनभाई शाह, सचिव रमेश डहाळे, कोषाध्यक्ष जितेंद्र येवले, भा. रा. सूर्यवंशी, देवराम सैंदाणे यांनी दिली. गेल्या अनेक वर्षांपासून हा पुरस्कार सोहळा सुरु होता. परंतु करोनामुळे ३ वर्षांपासून स्थगित करण्यात आला होता. त्यामुळे जूनमध्ये होत असलेल्या लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचच्या वर्धापनदिन सोहळ्यात वितरित होत असलेल्या या पुरस्कारासाठी नाशिकसह जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक संघांनी आपल्या कार्यक्रमांची माहिती आपल्या संस्थेच्या लेटर हेडवर दि.३० मेपर्यंत लोकज्योती कार्यालय, द्वारा चौधरी यात्रा कंपनी प्रा. लि., तिरूपती अपार्टमेंट, नंदिनी नदीरोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन संस्थेचे विठ्ठलराव सावंत, डी. एम. कुलकर्णी, बाळकृष्ण दंडगांवकर, बापू अमृतकर, प्रकाश महाजन, हरिश्चंद्र निंबाळकर, देवचंद पटेल, सुधाकर भालेराव यांनी केले आहे.

### सहा लाभार्थ्यांना शिलाई यंत्रवाटप



**नाशिकरोड ।** रोटरी क्लब ऑफ नासिकरोडतर्फे स्वर्गीय इवा मुखर्जी मेमोरियल स्त्री सशक्तिकरण प्रोजेक्ट - कृतार्थ हॉल, इंदिरानगर येथे आयोजित भारती येवले, मनीषा पवार, मंगल आलिंग, रोशनी बारे, पूनम गोंधट, ज्योती शेजवळ या लाभार्थ्यांना ६ सिंगर कंपनीनिर्मित - शिलाई मशीनचे वाटप केले. क्लब अध्यक्ष वर्षा जोशी आणि सचिव ज्ञानेश वर्मा यांच्या हस्ते ६ महिलांना त्यांची कमाईची क्षमता बळकट करण्यासाठी यंत्रे देण्यात आली. कोषाध्यक्ष हेमंत शिधाये, प्रकल्प प्रमुख फिरदौस कपाडिया, रोटेरियन सदस्य विभा पाटील, डी. जी. जोशी, विकास दिघे, दीपक पडवळकर, सुधीर सहानी, विवेकानंद देशपांडे, रसिका दाणी, देशपांडे उपस्थित होते. क्लबला प्रकल्प राबविण्यास मदत केल्याबद्दल शम्पा चक्रबर्ती यांचे विशेष आभार मानन्यात आले.

### अल्पसंख्याक विभागाकडून खड्ड्यांना श्रद्धांजली



**जुने नाशिक ।** महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस अल्पसंख्याक विभागातर्फे नाशिक महापालिका व स्मार्ट सिटी कंपनीच्या अनागोंदी कारभाराचा निषेध करून जुने नाशिकच्या आदमशाह चौक व काज़ीपुरा भागातील प्रमुख रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांना पुष्प वाहून श्रद्धांजली वाहण्यात आली. या अभिनव आंदोलनाची सर्वत्र चर्चा रंगली होती. प्रदेश अल्पसंख्यांक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष ज्येष्ठ नेते जावेद इब्राहिम यांच्या नेतृत्वाखाली हे अभिनव आंदोलन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक राजेंद्र बागुल, मुश्ताक सय्यद, अफ़रोज़ मणियार, संतोष हिवाळे, इफ़्तेदारुल काज़ी, परवेज़ शेख,हिसामोद्दीन खान, हिना इनामदार, इरफ़ान पिरज़ादा, शादाब काज़ी, सिराज शेख, इमरान शेख व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### शेतकरी मुलांचे लग्न जमण्यासाठी जनजागृती



**नाशिक ।** सध्याच्या काळात शेतकरी असलेल्या मुलांचे लग्न जमण्यास बऱ्याच अडचणी येत असून, शेतकरी मुलांना मुली देण्यास मुलींचे पालक लवकर तयार होत नाहीत. यावर समाजामध्ये जनजागृती करण्याचा निर्णय बैठकीत करण्यात आला.जालना येथे राज्यातील विविध भागात असलेल्या वंजारी समाज, वधू-वर सूचक पदाधिकारी यांची बैठक व त्यावर आधारित चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. जालना येथे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून अनेक वधू-वर सूचक पदाधिकारी तसेच अनेक मान्यवर याना निमंत्रित करण्यात आले होते. या बैठकीत नाशिकहून वधू--वर सूचक के. के. सानप, प्रभाकर धात्रक, दिलीप कुटे तसेच इतर जिल्ह्यामधून, जालना येथील शिक्षण महर्षी राजेंद्र राख, सुशीला मोराळे, लक्ष्मी गरकळ, काळूसे, गिते, घुगे, ढाकणे, दराडे, हूसे तसेच अनेक पदाधिकारी यांनी आपले विचार मांडून मार्गदर्शन केले.

# रस्ते तोडफोड :१२८ कोटी शुल्क मनपा तिजोरीत

## रस्ते दुरुस्ती कामाची गुणवत्ता तपासा : मागणी



**नाशिक | दि. २३ प्रतिनिधी**

शहर व उपनगरीय परिसरात विविध विकासकामे व योजनांसाठी रस्त्यांची तोडफोड सुरु आहे. त्यासाठी महापालिकेची परवानगी बंधनकारक असून बांधकाम विभागाकडून तोडफोडीचे शुल्क आकारले जाते. मागील आर्थिक वर्षात तोडफोड शुल्काचे तब्बल १२८ कोटी रुपये मनपाच्या तिजोरीत जमा झाले. त्यात महानगर गॅस कंपनीकडून सर्वाधिक शुल्क आकारण्यात आले आहे. मात्र तरीही दुरुस्त कामाला गती मिळत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

शहरात वीजपुरवठा, नळजोडणी किंवा मलनिस्सारण कामासाठी रस्ता तोडफोड करावी लागते. महापालिकेला प्राप्त झालेल्या शुल्कातून रस्त्यांची दुरुस्ती डांबरीकरण आदी कामे हाती घेतली जातात. व्यावसायिक व अव्यावसायिक पध्दतीने शुल्क आकारणी केली जाते. सध्या महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनीकडून पाईपलाईन टाकण्यासाठी शहरासह उपनगरात मोठ्या प्रमाणात रस्ते खोदले जात आहे. या माध्यमातून कंपनीचा पैसे कमावण्याचा उद्देश आहे. तर बीएसएनएल, रिलायन्स, एअरटेल आदी कंपन्यांकडूनदेखील ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यासाठी रस्ते खोदले जात आहे. त्यामुळे ठिकठिकाणी सिमेंट क्रॉंकिटसह नव्याने करण्यात आलेले डांबरी रस्तेदेखील नियमबाह्य पध्दतीने फोडण्यात आले आहेत.

या प्रकरणी मनपाने नॅचरल गॅस कंपनीला दंडही आकारला होता. या कंपनीकडून पन्नास ते साठ कोटी रुपये शुल्क आकारण्यात आले आहे. पाणीपुरवठा लाईन टाकण्यासाठी वीस कोटी शुल्क प्राप्त झाले. तसेच विकासकांनी बांधकाम करताना नियमबाह्य पध्दतीने रस्ते तोडफोड केल्याने त्यांनाही दंडासहित शुल्क आकारण्यात आले. एकूण १२८ कोटी तोडफोड शुल्क मनपाला प्राप्त झाले.

दरम्यान शुल्क प्राप्त झाल्याने मनपाने शहरात तोडफोड झालेले रस्ते दुरुस्तीचे काम गतीमान करणे गरजेचे आहे. मागील वर्षी खड्ड्यांच्या रस्त्याने नाशिककर त्रस्त झालेले होते. त्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर सूरू असलेल्या कामांची गुणवत्ता दर्जा व गती तपासण्याची गरज असल्याचे मत नाशिककर व्यक्त करीत आहे. मनपाने दुरुस्तीच्या नावाने जमा केलेल्या १२८ कोटी रुपयांतून विविध विकासकामांसाठी खर्च न करता त्यातून सक्षम रस्ते बांधण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गळक्या शाळा स्मार्ट कधी?

## निधीअभावी कामाची गती संथच

**नाशिक ।** मनपा शाळा येत्या शैक्षणिक वर्षात स्मार्ट करण्याचा धोरण राज्य शासनाने हाती घेतले आहे. त्या दृष्टीने शाळांची वर्ग अत्याधुनिक सुविधांनी सज्ज करण्यात येत आहेत. त्याचवेळी शाळांच्या इमारतींच्या देखभाल दुरुस्तीकडे मात्र साफ दुर्लक्ष होत असल्याने 'स्मार्ट' शाळा खरंच स्मार्ट होतील कां? असा सवाल पालकांमधून उपस्थित केला जात आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या ७० शाळांसाठी ७० कोटी रुपयांचा निधी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून खर्च केला जात आहे. या माध्यमातून शाळेचे वर्ग स्मार्ट करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. मात्र शाळा दुरुस्तीच्या खर्चामध्ये मनपा प्रशासनाने कपात करत तो निधी तीस टक्के खाली आणला आहे. मागील पंचवार्षिक शाळा देखभाल दुरुस्ती रिपेरिंगसाठी १५ कोटी रुपये निधी दिला जात होता. तो यावर्षी कमी करून ५ कोटी रुपयांवर आणण्यात आला आहे. त्यामुळे शाळांची दुरुस्ती कशी होणार, यावर प्रश्नचिन्ह लावला जात आहे.

याबाबत मनपा शिक्षण विभाग बांधकाम विभाग या दोघांनीही आयुक्तांकडे दिशा निर्देश केल्याने मनपा आयुक्त आल्यानंतर निधी उपलब्ध होईल काय? त्यानंतर देखभाल दुरुस्ती होणार काय? शाळेचे शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर दुरुस्तीचे काम सुरू होणार आहे काय? असे अनेक सवा उपस्थित केले जात आहेत. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्मार्ट यंत्रणा उभारून वर्ग स्मार्ट करण्याचा प्रयत्न असलेल्या शाळा पावसाच्या गळण्यातून त्याचे काय होईल याबद्दल शंका उपस्थित केली जात आहे. प्रभारी आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी यात लक्ष घालून शाळांच्या दुरुस्ती कामाला गती देऊन पावसाळ्यापूर्वी शाळा दुरुस्ती काम पूर्ण करण्याबाबत संबंधितांना निर्देशीत करण्याची मागणी पालक वर्गांमधून केली जात आहे.

# विभागवार तपासणीला पहिल्या भेटीनंतर विसर

## इ-मुव्हमेंट प्रणाली ढेपाळली

**नाशिक | दि. २३ प्रतिनिधी**

महापालिका प्रभारी आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी मुख्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वैर वागण्याला लगाम लावण्यासाठी अतिरिक्त आयुक्तांना दिवसातून अचानक भेट देण्याचे आदेश दिले होते. पहिल्या आठवड्यात त्याची काटेकोर अंमलबजावणी झाली. मात्र चालू आठवड्यात एकही अचानक व्हिझिट झाली नसल्याने प्रशासनाला मरगळ येण्याची चिन्हं दिसून येत आहे.

महापालिका आयुक्त डॉ. पुलकुंडवार मसुरी येथे एक महिन्याच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाल्यानंतर आठ दिवसांत बेशिस्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रभारी मनपा आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी चांगलेच शिस्तीवर आणले होते. खातेप्रमुखांच्या बैठकीत दोन्ही अतिरिक्त आयुक्तांना दिवसातून तीन वेळा विविध विभागात भेटी देण्याचे निर्देश दिले. त्यामुळे बैठकीच्या नावाखाली बाहेर बिनधास्त फिरणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना चांगलीच धडकी भरली होती.

मागील आठवड्यात वीस ते तीस अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत गैरहजर असल्याचे आढळले होते. त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करत त्यांचे एक दिवसाचे वेतन कापण्यात आले होते. चालू आठवड्यातही अचानक व्हिझिट होणे अपेक्षित होते. पण एकही व्हिझिट न झाल्याने पुन्हा पूर्वीप्रमाणे आनंदी आनंदाचे वातावरण पहायला मिळत आहे.

### इ-मुव्हमेट प्रणाली

कर्मचाऱ्यांना कामानिमित्त बाहेर जाण्यासाठी अधिकाऱ्यांची परवानगी ऑनलाईन यंत्रणाद्वारे घेणे बंधनकारक करण्यात आले होते. याबाबत कर्मचाऱ्यांची नोंदणी करणयचे काम संथ गतीने झाल्याने अद्याप ही यंत्रणा कार्यरत झालेली नसल्याचे काही विभागातून दिसून आले. तर काही अधिकाऱ्यांद्वारे अद्याप कोणीच परवानगी मागितली नसल्याचे सांगण्यात आले. अधिकारी व कर्मचाऱ्यांची मिलीजुली सरकार आहे काय? असा सवालही उपस्थित केला जात आहे. प्रशासनाकडे अद्याप याचा सविस्तर अहवाल उपलब्ध होऊ शकलेला नसल्याने या प्रणालीच्या कार्यक्षमतेबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

# जि.प. आवारातच पाण्याची वानवा

**नाशिक | दि. २३ प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या विकासाचे मुख्य केंद्र असलेल्या व जिल्ह्याला पाणी पाजणाऱ्या जिल्हा परिषदेत पिण्याच्या पाण्याची वानवा अनुभवयास येत आहे. संपूर्ण जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या पाण्याचे नियोजन करणाऱ्या जिल्हा परिषदेतच पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसल्याने ग्रामीण भागाकडून आलेल्या नागरिकांचे तसेच ठेकेदार, अभ्यांगत यांना साधे पाणीही लवकर मिळत नाही.

जिल्हा परिषदेत अधिकारी कर्मचारी वगळता दररोज साधारण पाचशे ते सहाशे सर्वसामान्य नागरिकांचा काही ना काही कामानिमित्त राबता असतो. येथे आल्यानंतर नागरिक जिल्हा परिषदेच्या आवारात कुठेही पिण्याच्या पाण्याची



व्यवस्था नसल्याकारणाने तहानेने व्याकुळ होत आहे. याबाबत प्रशासनाकडे मागणी केली असता बघतो, करतो, अशी प्रशासनाची भूमिका असल्याने पाण्याचा प्रश्न मिटणार की असाच रेंगाळत राहणार आहे.

सध्या नाशिकमध्ये तापमानाचा पारा सतत ३७ ते ४२ अंश सेल्सियसपर्यंत आहे. गेल्याच महिण्यात उष्माघाताने अनेकांचे प्राण गेल्याची घटना घडली आहे. या पार्श्वभूमिवर आरोग्य प्रशासनाने जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष उभारला आहे. उष्माघाताबाबत एवढी काळजी घेतली जात असली, तरी जिल्हा परिषदेच्या आवारात एकही पिण्याची पाण्याची टाकी, जलकुंभ किंवा फिल्टर अशी काहीच व्यवस्था नाही. याबाबत जिल्हा परिषद प्रशासन काही कार्यवाही करणार आहे की त्याच परिस्थितीत उन्हाळा घालवणार, याकडे लक्ष लागले आहे.

### फिल्टरही बंद दाराआड

जिल्हा परिषदेत प्रशासकीय राजवट सुरु असल्याने पदाधिकाऱ्यांच्या दालनाला कुलुप लावण्यात आले आहे. या ठिकाणी असलेले फिल्टर देखिल त्यामुळे बंद दाराआड गेले असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या फिल्टरचा तरी वापर करण्यात यावा, अशी चर्चा जिल्हा परिषदेत होत आहे.

# रमाई आवाससाठी १२० कोटींचा निधी

**नाशिक | दि. २३ प्रतिनिधी**

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील कुटुंबांचे घरकुलाचे स्वप्न साकार होणार आहे. त्यासाठी राज्याच्या समाज कल्याण आयुक्तालयाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये १२० कोटी रुपयांचा निधी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई यांच्याकडे नुकताच वर्ग केला आहे.

राज्याचे समाजकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या पाठपुराव्यामुळे हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. रमाई आवास योजना (ग्रामीण) करिता १२० कोटी इतका निधी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई या राज्यस्तरीतय यंत्रणेकडे सुपुर्द करण्यात आला आहे. राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील कुटुंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण भागामध्ये सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्यावतीने रमाई आवास योजना राबविली जाते. अर्थिक परिस्थितीमुळे स्वतःचे घर बांधकाम करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. लाभार्थ्यांना स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर रमाई आवास हजार इतकी आहे. योजनेतून बांधून दिले जाते.

या योजनेत २६९ चौ. फू. क्षेत्रफळ बांधकामासाठी सर्वसाधारण क्षेत्रासाठी एक लाख ३२ हजार व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी एक लाख ४२ हजार इतके प्रति लाभार्थी अनुदान (१२) हजार रुपये शौचालय बांधकामासह) दिले जाते. मंजूर अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ऑनलाइन प्रणालीद्वारे जमा करण्यात येते. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी कुटुंबाची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये एक लाख २० हजार इतकी आहे.

सन २३-२४ या आर्थिक वर्षात माहे मे, २०२३ मध्ये एकूण १२० कोटी इतका निधी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेस उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नागरिकांचे स्वतःच्या घरकुलाचे स्वप्न साकार होणार आहे, असे समाजकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी सागितले.

# आ.नितेश राणेंकडून महाआरती

**नाशिक | दि. २३ प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर मंदिराच्या वादावर ग्रामस्थांकडून पडदा टाकत असताना आज भाजपचे आ. नितेश राणे यांनी महाआरती केली. याचबरोबर मंदिर बचाव समितीच्या वतीने देखील आरती करण्यात आली आहे. यावेळी माजी आदिवासीमंत्री अशोक उईके उपस्थित होते.

आ. राणे आज नाशिक दौऱ्यावर होते. सकाळी त्यांनी त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शन घेतले. त्याचबरोबर विविध संघटनाच्या माध्यमातून मंदिरात महाआरती करण्यात आली. त्र्यंबकेश्वरच्या मंदिरात धूप दाखविण्याची कोणतीच परंपरा नाही, असा दावा महाआरतीनंतर आ. नितेश राणे यांनी केला.

ते म्हणाले की, येथे जो उरुस काढला जातो. तो मंदिराच्या बाहेर काढला जातो. मंदिराच्या बाहेरच्या परिसरातून हा उरुस जातो. तेथे ते कुणाला धूप दाखवितात, याच्याशी आम्हाला काहीच देणेघेणे नाही. मंदिरात कोणाच्या येण्यावर आमचा आक्षेप नाही. मंदिरात तुम्हाला दर्शन घ्यायचे असेल तर रांगेत उभे राहून घ्यावे. मात्र, १३ मे रोजी जे युवक आले होते. त्यांच्या हातात हिरवे झेंडे होते. ते झेंडे घेऊन जाण्याचा ते हट्ट का करत होते. म्हणजेच त्यांचा हेतू चांगला नव्हता, असा आरोपही राणेंनी केला.

भारतीय जनता पार्टीचे आध्यात्मिक आघाडीचे संयोजक आचार्य तुषार भोसले यांनी सोमवारी भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले की, त्र्यंबकेश्वर मंदिरासमोर धूप दाखविण्याच्या घटनेबाबत राज्यात बरीच चर्चा चालू आहे. मंदिरासमोर धूप दाखविण्याची प्रथा १०० वर्षांपासूनची आहे, असा दावा ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी केला होता. खा. राऊत यांचा हा दावा सपशेल खोटा आहे. या घटनेसंदर्भात स्थानिक शांतता समितीने पत्रकार परिषदही घेतली होती. त्या पत्रकार परिषदेत मंदिराबाहेरच्या चौकात धूप दाखविण्याची प्रथा आहे, असे सांगण्यात आले होते. असे असताना काही मंडळी या वादाला विनाकारण वेगळे वळण देत आहेत. राऊत यांनी परंपरेचे जाहीरपणे पुरावे द्यावेत, असे आव्हान भोसले यांनी दिले आहे.

# सामूहिक विवाहांसाठी ५० लाखांचा निधी

**नाशिक ।** राज्याच्या समाज कल्याण विभागाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात सामूहिक विवाह सोहळ्यांमध्ये विवाह करणाऱ्या मागासवर्गीय जोडप्यांना व सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना कन्यादान योजनेअंतर्गत ६० लाख इतका निधी राज्य शासनाने मंजूर केला आहे.

कन्यादान योजनेमध्ये २० हजार इतकी रक्कम वधूचे वडील, आई किंवा पालकांची नावे अधोरेखित धनादेशाद्वारे विवाहाच्या दिवशी देण्यात येते. तसेच, सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजक स्वयंसेवी संस्थांना प्रत्येक जोडप्यामागे चार हजार रुपये असे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. समाज कल्याण विभागाने गतिमान यंत्रणा राबवून सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय जोडप्यांना व सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ६० लाख रुपयांचा निधी ३ मे २०२३ शासन ज्ञापनानुसार मंजूर केला आहे. सद्यःस्थितीत हा मंजूर केलेल्या निधीतून जोडप्यांना प्रत्येकी २० हजार याप्रमाणे रुपये ५० लाख रुपये व स्वयंसेवी संस्थेला प्रत्येकी एका जोडप्यामागे चार हजार याप्रमाणे १० लाख रुपये तत्काळ सहायक आयुक्त समाज कल्याण यांना उपलब्ध करून दिले आहेत. हा निधी लवकरच संबंधित जोडप्यांना व संस्थांना मिळणार आहे.

### नाईक महाविद्यालयात संशोधन केंद्रास मान्यता

**नाशिक ।** क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य व राज्यशास्त्र विषयातील संशोधन केंद्राला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मान्यता दिली आहे.संस्थेच्या या महाविद्यालयाला संशोधन केंद्राची मान्यता मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, उपाध्यक्ष ॲड. पी. आर, गिते, सरचिटणीस हेमंत धात्रक, सहचिटणीस ॲड. तानाजी जायभावे यांनी याबाबत महाविद्यालयातील प्राचार्य, विभागप्रमुख व संशोधक मार्गदर्शक यांचे अभिनंदन केले.

या विषयात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पीएच. डी. ला प्रवेश घेता येणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. संजय सानप यांनी दिली. तसेच आगामी काळात महाविद्यालयातील अजून काही विभागांमध्ये संशोधन केंद्र सुरु करून विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली. सदर संशोधन केंद्र मिळवण्यासाठी उपप्राचार्या डॉ. पौर्णिमा बोडके, डॉ. संजय काळे, डॉ. धीरज झाल्टे, डॉ. रुपाली सानप, डॉ. राजेंद्र झोळेकर, डॉ. विजय नौकुडकर, राजेंद्र तिवडे, विवेक गामणे, सोमनाथ धात्रक, अविनाश दरगोडे तसेच सर्व अध्यापक व शिक्षकेतर सेवकांनी प्रयत्न केले.

TAPARIA
**TAPARIA TOOLS LTD.**
**(Regd. Office: 52 & 52B, MIDC Area, Satpur, Nashik – 422 007) Tele. :(0253) 2350317/318/418,**
**E-Mail: nashik@tapariatools.com**
**CIN : L99999MH1965PLC013392**

**NOTICE**

Pursuant to Regulations 29 and 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations 2015, Notice is hereby given that a Meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Tuesday, the 30th May 2023 at 12.40 PM at its Registered Office at 52 & 52B, MIDC Area, Satpur, Nashik – 422 007, Maharashtra to consider and approve "The Statement of Standalone Audited Financial Results for the quarter and year ended 31st March 2023", "The Financial Statements of the Company for the Financial Year – 1st April 2022 to 31st March,2023", "Recommendation of Final dividend on the Ordinary Shares for the Financial Year ended 31st March 2023", "Board's Report for F.Y. 2022-2023", "Notice for 57th Annual General Meeting"and other matters.

The Meeting will be conducted through video conferencing.

The details are also available on the Company's website at www.tapariatools.com and Bombay Stock Exchange website at www.bseindia.com.

Nashik,
22nd May 2023

**For Taparia Tools Ltd.**
**Sd/-**
**V.S. Datey**
**Company Secretary**

प्रथम पुण्यस्मरण

सहवास जरी सुटला तुमचा स्मृति सुगंध देत राहील,
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहिल.



कै. भास्कर (आबा) कृष्णा कोठावदे

यांचे प्रथम पुण्यस्मरण

* शोकाकुल *

आण्णासाहेब देशमुख — व्हा. चेअरमन
काशिनाथ चव्हाण — चेअरमन
लक्ष्मीकांत कोठावदे — मानद कार्यकारी संचालक
दिनकर उगले — जनसंपर्क संचालक
सौ. विद्या पिसु — सरव्यवस्थापिका

सर्व संचालक मंडळ, सल्लागार सदस्य, सेवकवृंद व अल्प बचत प्रतिनिधी

दि सुवर्णलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिक

# CSK reach final for 10th time

**CHENNAI:** Chennai Super Kings reached the final for the 10th time after defeating Gujarat Titans by 15 runs in Qualifier 1 of the Indian Premier League here on Tuesday. While chasing a target of 173 for win, Gujarat Titans managed to make 157 runs at the loss of all wickets. For the team, Shubman Gill scored 42 runs.

Earlier, a disciplined bowling performance by the Gujarat Titans on a tricky surface helped the defending champions restrict Chennai Super Kings to 172 for 7. Put in to bat by GT captain Hardik Pandya, the Super Kings batters had a tough time on a slow pitch as they were not able to force the pace.

Talismanic skipper Mahendra Singh Dhoni lasted only 2 balls for his 1 run, much to the disappointment of an adoring Chepauk crowd. For the home team, Ruturaj Gaikwad was the best batter, scoring a superb 60 off 44 while the others could not make a substantial contribution.

Pacer Mohammed Shami (2 for 28 in 4 overs) was the best bowler while Mohit Sharma (2/31) also picked up two wickets. Rashid Khan and Noor Ahmed scalped a wicket each and put pressure on the batters in the middle overs.

**Brief Scores: Chennai Super Kings:** 172/ 7 (Ruturaj Gaikwad 60; Mohammed Shami 2/28) **beat Gujarat Titans 157/10** (Shubman Gill 42; Ravindra Jadeja 2/18) by 15 runs

# BCCI, Adidas announce partnership

**MUMBAI:** BCCI and Adidas, a global sportswear brand, on Tuesday announced a brand-new partnership as the kit sponsor for the BCCI.

The contract, which runs through to March 2028, will give Adidas exclusive rights for manufacturing kit across all formats of the game.

Adidas will also be the sole supplier for all match, training and travel wear for the BCCI- including the men's, women's and youth teams.

Speaking about the partnership, BCCI Honorary Secretary Jay Shah said: "We are committed to helping grow the game of cricket and could not be more excited to partner with one of the world's leading sportswear brands, Adidas, in this journey."

With its rich historical legacy in sports, world class products, and strong global reach, Adidas will play an important role in driving the performance and future success of different categories of Indian cricket, he said.

Starting June 2023, Team India will be seen in the three stripes for the very first time and will debut their new kit during the World Test Championship Finals.

The partnership between BCCI and Adidas will drive the sport forward both on and off the pitch with the sports brand bringing its innovative designs and expertise to Indian cricket.

Adidas has a long history of equipping some of the best teams in the world with footwear and apparel, created to be the best for the athlete.

BCCI and Adidas will also bring their partnership to life by inspiring the next generation of young cricketers and growing the game for all.

Adidas CEO Bjorn Gulden said: "We are proud to partner with BCCI and Team India, the most iconic team in India. Cricket is the most important sport in India, and it is very important for us to be visible and invest in it. We could not have found a better partner than the BCCI. I believe India to be the fastest growing sports market for the next decades. We are very committed to supporting our team to become the best sports brand in India."

Adidas India GM Neelendra Singh said the company looks forward to creating moments with consumers through the most celebrated sport in India. "Adidas truly believes in the potential of cricket in India and through this partnership with BCCI we will accelerate growth," he said.

With its rich history in sport through its long term and innovative agreements with the likes of World Champions AFA (Argentina Football Association), the All Blacks, Major League Soccer, and sports teams all over the globe, the new partnership with the BCCI will further enhance the brand's presence across the region and strengthen its commitment towards growing sports in India.

In addition to the men's and women's senior national cricket team, Adidas will also kit the India-A Men's and Women's National Team, India-B Men's and Women's National Team, India U-19 Men's and Women's National Team, their coaches, and staff.

# KIUG should be grand affair: Yogi

**LUCKNOW:** UP CM Yogi Adityanath on Tuesday said that Khelo India University Games (KIUG) should be divine and grand, creating a unique identity of the state in the field of sports as well among the guest players, visitors and coaches.

The CM was reviewing the preparations for the first Khelo India University Games to be held in four cities of UP from tomorrow (May 25) to June 3.

He said that UP is hosting the third edition of the KIUG. "This event should be divine and grand, which created a unique identity of the state in the field of sports as well among the guest players, visitors and coaches." Yogi had a detailed discussion on the sports events to be held in Lucknow, Gorakhpur, Gautam Buddha Nagar and Varanasi during the 10-day Khelo India University Games. He said that special preparations should be made for the children coming from outside in terms of food, shelter, and security. "Proper arrangement should also be made to deliver resources to the location," he said.

He said, "There should be adequate arrangements for the security of the players arriving from outside if they want to go for a walk." Sports Minister Girish Chandra Yadav, Chief Secy Durga Shankar Mishra, Additional CS (Sports) Navneet Sehgal, Principal Secy (CM and Home) Sanjay Prasad, Divisional Commissioner Roshan Jacob and District Magistrate Surya Pal Gangwar were present in the meeting.

## Neeraj World Number one in men's javelin throw rankings



**NEW DELHI:** FILE PICIndia's Tokyo Olympics gold medallist Neeraj Chopra elevated to the top of the latest men's javelin throw and He is the new World No.1 in the rankings issued by the World Athletics.

Chopra was leading the ranking with 1455 points, 22 ahead of Grena's Anderson Peters. Chopra had been at the No.2 position since August 30, 2022, but overtook Peters, the reigning world champion, this week.

## Men's Cricket WC Qualifier

# Fixtures released

**DUBAI:** The schedule for the ICC Men's Cricket World Cup Qualifier has been released, following the confirmation of the 10 teams that will feature at the event hosted in Zimbabwe from June18 to July 9.

Each match will be high stakes, with teams contesting for two places at the ICC Men's Cricket World Cup 2023 in India that gives them nine guaranteed matches at cricket's ODI global showpiece.

The 10 teams taking part in the qualifier are split into two groups of five teams. Hosts Zimbabwe, the West Indies, the Netherlands, Nepal and the United States make up Group A, while Sri Lanka, Ireland, Scotland, Oman and the United Arab Emirates form Group B.

Each side will play the other teams in their group once with the top three from each group progressing to the Super Six stage. In the Super Six, they will play the sides they did not meet in the group stage.

All points won in the group stage will be carried over to the Super Six stage apart from those gained against the teams that fail to make it to the Super Six stage. The finalists will both progress to the ICC Men's Cricket World Cup 2023.

Queen's Sports Club and Bulawayo Athletic Club in Bulawayo, Harare Sports Club and Takashinga Cricket Club in Harare will share 34 matches between them, with Harare Sports Club staging the final on July 9. Old Hararians Cricket Club will also host warm-up fixtures.

## J&K Cricket Association to host Fan Park

**JAMMU:** In a first of kind initiative, Jammu and Kashmir Cricket Association (JKCA) is hosting the 'Fan Park' event for cricket lovers to watch Indian Premier League (IPL) final on big screen on May 28 at Padma Shri Padma Sachdev Government PG College ground, Gandhi Nagar.

Member Administration, J&K Cricket Association, Brig (Retd). Anil Gupta on Tuesday said that IPL 'Fan Park' is being organised on May 28 and apart from providing an experience of watching the final of IPL on a giant screen, it will also have fun frolics and eateries.

"The event will be a great opportunity for the youth and other cricket lovers of Jammu and nearby places to watch and enjoy the final of IPL in a festival like atmosphere," he said.

The JKCA member said that a curtain raiser to the first ever IPL 'Fan Park' will also be held at Pavilion Building, Jammu a Kashmir Cricket Association behind GGM Science College at 11 am on May 26.

# Uganda to host ICC Women's T20 WC qualifiers

**KAMPALA:** The International Cricket Council (ICC) has selected Uganda to host the final round of the ICC Women's T20 World Cup qualifiers for the African region.

Alan Mugume, the Chief Executive Officer of the Uganda Cricket Association (UCA) confirmed the development to News agency on Monday.

The event at the Lugogo Cricket Oval in the capital Kampala is scheduled for Dec. 7-18.

Eight teams including hosts Uganda, Zimbabwe, Tanzania, Rwanda, Nigeria, Namibia and two others that will qualify from the Division Two qualifiers in Botswana in October will take part.

According to the ICC, the top two sides from the qualifiers in Kampala will qualify for the global qualifiers to represent Africa. The Women's T20 World Cup 2024 will be held in Bangladesh.

Joshua Mwanja, the UCA Operations Manager, thanked ICC for having the confidence to give Uganda yet another high level event to host.

"We are excited to host the T20 Women's qualifiers. This shows the faith that ICC has in our capacity to host an event of this magnitude. The work for us starts immediately to prepare the grounds and also ensure we get local partners to come on board and support us," added Mwanja.

Uganda played in the T20 Women's global qualifiers in 2018 in the Netherlands after winning the African regional qualifiers in Namibia in 2017.

# Newgen recognised in Gartner's Market Guide

**NEW DELHI:** Newgen Software, a global provider of low code digital transformation platform, is pleased to announce that its Newgen's Provider Lifecycle Management (PLM) Solution has been featured in Gartner's "Market Guide for U.S. Healthcare Payers' Provider Network Management Applications 2023 Report." This guide assists health plan CIOs and business executives in selecting the best provider network management solutions and transforming their provider operations.

Newgen's Provider Lifecycle Management Solution, built on NewgenONE—a low code and cloud-based digital transformation platform—contributes to the development of a high-quality network of providers, responsible for the healthcare of members, governed by Federal and State regulations.

The solution brings together different functions, including contract management, provider onboarding & maintenance, pricing, and self-service. Furthermore, it eliminates information silos, simplifies data management practices, and strengthens provider relationships.

## BPCL Q4 profit surges 259 pc

**NEW DELHI:** Public sector Bharat Petroleum Corporation Ltd (BPCL) on Monday reported a 259% year-on-year jump in standalone net profit at Rs 6,477.74 crore for January-March quarter (Q4) of the financial year 2022-23.The oil major had posted a profit of Rs 2,501.08 crore in the same quarter a year ago. BPCL's standalone revenue from operations stood at Rs 1,33,413.81 crores for the March quarter of fiscal 2022-23 as compared to Rs 1,23,382 crore in the corresponding quarter of the previous year.

As per official statement, the oil company posted a standalone net profit of Rs 1,870.10 crores for FY23, as compared to the restated profit of Rs 11,363.35 crores in FY22. For the financial year ending March 2023, BPCL recorded the highest-ever revenue from operations at Rs 5,33,467.55 crore as against Rs 4,32,422.48 crores in the previous year.

# Dairy Don: Tale of Ice Cream Thrives with Swiggy

**NASHIK:** Dairy Don, a renowned soft serve ice cream business in Nasik, Maharashtra, shares its success story of overcoming challenges and thriving in the digital era with the help of Swiggy, India's leading food delivery platform. From humble beginnings in 1981, Dairy Don has expanded its offerings to over 40 ice cream flavors, numerous softy variations, and a wide range of shakes. The collaboration with Swiggy has played a pivotal role in helping this family-run business keep its cool and thrive in the modern food industry.

Starting an ice cream business in India during the early 1980s was no easy feat. The brothers had to navigate the scarcity of ice cream machines and limited availability of fresh ingredients. With a determination to bring something new to the market, they embarked on the journey of manufacturing ice creams. Over the course of a year, they honed their skills through trial and error, eventually training their employees as the business gained momentum.

Working closely with Swiggy, Dairy Don has implemented various strategies to enhance the customer experience, including menu optimization, packaging improvements, and ad and discount campaigns. According to Akshay Yeola, who joined the family business 15 years ago, data plays a pivotal role in driving Dairy Don's success. He says "Partnering with Swiggy was a game-changer for Dairy Don.

## Ashok Leyland registers revenue

**CHENNAI:** Ashok Leyland Limited, flagship of the Hinduja Group, reported a revenue of Rs. 11,626 crore in Q4 FY '23 compared to Rs. 8,744 crore for the same period last year.

A company release said revenue grew by 33% year on year. The Operating PBT for the quarter was at Rs. 1,068 crore vis-a-vis Rs. 528 crore for the same period last year. PAT was at Rs.751 crore as against a Rs. 901 crore in Q4 last year. Q4 EBITDA was at 11.0 % as against 8.9% last year.

Ashok Leyland's truck market share for Q4 FY '23 has improved to 32.7 % vis-a-vis 30.6 % in Q4 FY '22. Bus market share for Q4 FY23 has improved to 27.1 % as against 26.4 % for the same period last year.


TAPARIA

**TAPARIA TOOLS LTD.**

**(Regd. Office: 52 & 52B, MIDC Area, Satpur, Nashik – 422 007) Tele. :(0253) 2350317/318/418,**
**E-Mail: nashik@tapariatools.com**
**CIN : L99999MH1965PLC013392**

**NOTICE**

Pursuant to Regulations 29 and 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations 2015, Notice is hereby given that a Meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Tuesday, the 30th May 2023 at 12.40 PM at its Registered Office at 52 & 52B, MIDC Area, Satpur, Nashik – 422 007, Maharashtra to consider and approve "The Statement of Standalone Audited Financial Results for the quarter and year ended 31st March 2023", "The Financial Statements of the Company for the Financial Year – 1st April 2022 to 31st March,2023", "Recommendation of Final dividend on the Ordinary Shares for the Financial Year ended 31st March 2023", "Board's Report for F.Y. 2022-2023", "Notice for 57th Annual General Meeting"and other matters.

The Meeting will be conducted through video conferencing.

The details are also available on the Company's website at www.tapariatools.com and Bombay Stock Exchange website at www.bseindia.com.

Nashik,
22nd May 2023

**For Taparia Tools Ltd.**
**Sd/-**
**V.S. Datey**
**Company Secretary**


# Fortis hospital becomes first to perform TAVI

**NASHIK:** The patient, Neelam Deshmukh (78), was in a critical condition for nearly two weeks, when she received a new lease on life after she underwent Transcatheter Aortic Valve Implantation (TAVI) at Fortis Hospital, Kalyan. The procedure was performed by Dr Vivek Mahajan, Consultant-Interventional Cardiology and his team at Fortis Hospital, Kalyan on March 31, 2023.The success of this procedure is a medical landmark for Kalyan!

Neelam Deshmukh, a resident of Nashik was experiencing breathlessness, weakness, blackouts, chest discomfort on minimal exertion, and disrupted sleep a month prior to her procedure. She was admitted to a hospital in Nashik where she underwent multiple tests; while her angiogram was normal, the 2D echocardiography reports indicated severe Aortic Stenosis. In this condition, the leaflets of the aortic valve (present at the beginning of aorta, into which heart pumps blood meant to be supplied to various body parts)do not open properly, due to an obstruction. This obstruction of blood flowresulted into tiring and weakening of the heart (as it got overworked), also known as 'left ventricular failure'.

The patient continued to experience low blood pressure, caused by inadequate blood circulation throughout her body.This had an adverse effect on her Kidneys, leading to an increase in creatinine levels up to 2.7mg/dL,which was double than the normal levels (between 0.5 to 1.1 mg/dL). Her conditiondeterioratedrapidly, and she was shifted to Fortis Hospital, Kalyan for further treatment. The obstruction in the aortic valve and failure of the left ventricularhad resulted in blood accumulation&swelling in the lungs, resulting in low oxygen levels and extreme breathlessness.


kotak® Kotak Mahindra Bank

**Kotak Mahindra Bank Limited**

Regd office: 27BKC, C 27, G Block, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai – 400 051
Corporate office: Kotak Infiniti, Bldg No 21, Infinity Park, General AK Vaidya Marg, Malad (E), Mumbai-400097
**www.kotak.com**

**AUCTION-NOTICE**

That the below mentioned Borrower/s had availed gold loan facility against security of the gold ornaments/ items, as specified below. The Borrower/s defaulted in due repayment of the installments and outstanding dues and as a result of which the Bank was constrained to issue notices calling upon the Borrower/s to repay the outstanding amounts. However, the Borrower/s has failed to repay/clear his outstanding dues thereby compelling the Bank to auction the gold ornaments pledged in favour of the Bank.

The open auction of the above mentioned gold ornaments would be held at :-

Date: 30-May-2023 Time: 11:00 AM Place: Respective Sub Locations

| ApplApac | Party Name | State | Location | Sub Location | Gross Wgt |
|---|---|---|---|---|---|
| GLN2415645 | Dnyaneshwar Shivram Bambale | Maharashtra | Nasik | Ambadroad | 13.41 |
| GLN2476102 | Roshanlal Ashokkumar Verma | Maharashtra | Nasik | Anandvali | 10.24 |
| GLN2204657 | Lalit Maharu Mahajan | Maharashtra | Pune | Chalisgaon | 68.67 |
| GLN2485437 | Kunal Chandrashekhar Kankate | Maharashtra | Nasik | Dhule | 60.31 |
| GLN2535591 | Sachin Daulat Jadhav | Maharashtra | Nasik | Dhule | 21.30 |
| GLN2298283 | Vijay Laxman Gharu | Maharashtra | Nasik | Dhule | 8.20 |
| GLN2399000 | Mahendra Vilas Jadhav | Maharashtra | Pune | Dindori | 15.70 |
| GLN2318624 | Amit Nawal Mishra | Maharashtra | Nasik | Indirangr | 36.03 |
| GLN2537371 | Sateesh Bhrigunath Gupta | Maharashtra | Nasik | Nashikroad | 98.32 |
| GLN2389850 | Firoz Faruk Shah | Maharashtra | Nasik | Nashikroad | 14.82 |
| GLN2389827 | Firoz Faruk Shah | Maharashtra | Nasik | Nashikroad | 26.65 |
| GLN2131754 | Rajput Govind Sohanlal | Maharashtra | Nasik | Nashikroad | 15.38 |
| GLN2531700 | Sachin Sampat Ghuge | Maharashtra | Nasik | Nashikroad | 13.00 |
| GLN2424164 | Amit Tanaji Purkar | Maharashtra | Nasik | Niphad | 7.61 |
| GLN2517680 | Abhay Shamraj Dole | Maharashtra | Nasik | Payas | 73.40 |
| GLN2523429 | Rupesh Jhaverilala Chhajed | Maharashtra | Nasik | Payas | 18.15 |
| GLN2566697 | Dhananjay Pandharinath Dhonnar | Maharashtra | Nasik | Payas | 31.39 |
| GLN2522972 | Sopan Gorakhnath Jeughale | Maharashtra | Nasik | Payas | 13.66 |
| GLN2372123 | Dinesh Kantilal Bhanushali | Maharashtra | Nasik | Payas | 77.18 |
| GLN2255256 | Rahul Bhanudas Patil | Maharashtra | Nasik | Payas | 115.21 |
| GLN2390797 | Sandeep Mohan Chaudhari | Maharashtra | Nasik | Payas | 65.01 |
| GLN2551840 | Bhavesh Bipin Vora | Maharashtra | Nasik | Pimpalgn | 47.37 |
| GLN2547360 | Rushikesh Sudhakar Gite | Maharashtra | Nasik | Pimpalgn | 56.25 |
| GLN2518310 | Javahar Kanhaiya Sah | Maharashtra | Nasik | Satanamcl | 14.50 |
| GLN2454925 | Sitaram Ramchandra Bhamre | Maharashtra | Nasik | Satanamcl | 29.96 |
| GLN2552261 | Bhagyashri Pravin Datre | Maharashtra | Nasik | Satanamcl | 20.51 |
| GLN2545797 | Rashid Munvar Shah | Maharashtra | Nasik | Shrirampur | 18.80 |
| GLN2561259 | Sachin Kisan Shewale | Maharashtra | Nasik | Soyagaon | 25.00 |
| GLN2375053 | Yash Vijay Pawar | Maharashtra | Nasik | Soyagaon | 36.00 |

Bidders are requested to Submit a copy of their Photo – identity, signature and address proof along with their original for verification together with two recent photographs on 29-05-2023 by 4pm at Respective Branch Premises. Also individual bidder should be present to handover the documents.The Bank reserves the right to change the venue/date/time of auction or cancel the auction / finalise the highest bid without any notice to bidders. The cost of the auction process will be debited to the customer account. Bank reserves the right to recover the balance amount from the customer if the bid amount is insufficient to meet the payoff amount of the account.
For any further details/assistance/clarification regarding the terms and conditions of the auction, you are required to contact Mr.Affan Parkar-9769893241



**PUBLIC NOTICE**

It is hereby inform to public at large that,

Description of the property- All that piece and parcel of constructed premises bearing **Flat No. 12** on First Floor admeasuring area 55.76 Sq. Mtrs, in the building known as **Merigold Co. Op. Housing Society Ltd.** constructed upon **Plot No. 4** admeasuring area 777.50 Sq. Mtrs. out of **S. No. 31/2/2/2,** situated at **village Deolali,** within the limits of Nashik Municipal Corporation Nashik

The above property was owned and possessed by **Mr. Arvind Balkrushna Purandare**, who died on 24.07.1999, after his demise property came in the hands of his legal heirs **widow Sulochana Arvind Purandare, sons Sameer and Sunil Arvind Purandare and daughter Mrs. Preeti Kanwarjit Lamba** and they are they assured that they are the only legal heirs to deceased, except them no other legal heirs and their title to said property is free clear, marketable and free from all encumbrances. The above owners decided to transfer the said property to Pratiksha Nandkishor Shirude and Mrs. Varsha Nandkishor Shirude and Pratiksha Nandkishor Shirude and Mrs. Varsha Nandkishor Shirude decided to availed loan from my client Yes Bank Ltd and offered the said property as security to my client

Hence it is called upon that anyone have any right, title, interest, heirship rights, in the said property, common persons should furnish or submit their objection with me within period of 07 days from the date of this notice with our office along with documents. Objection published in the news papers cannot be considered and the same will be not be considered. If anyone has not raised any objection my client will create their first charge upon the said property. Hence this notice, Dtd. 21/05/2023

**Pravin Vijaysingh Sambre Advocate**

**Office No, FM-16/13, first floor, Above Towri Medical Thakkar Bazzar, New C. B. S. Nashik**



**PUBLIC NOTICE**

**The Arbitral Tribunal**

For The Kalyan Janata Sahakari Bank Ltd.,
(Appointed U/s 84 of MSCS Act, 2002)
Lobhas CHS Ltd., Ground Floor, Opp. IDBI Bank, Tilak Chowk, Kalyan (West) 421 301

The Kalyan Janata Sahakari Bank Ltd. has filed Application U/s 84 of MSCS Act, 2002 before this Arbitral Tribunal for recovery of loan amount. The Tribunal has issued Summons by R.P.A.D. to the Borrower on their respective address, available on record. However, the same were undelivered and returned to the source. By this Public Notice, the Tribunal hereby informs the below named **Borrower** that the **"Hearing"** on application filed before this Arbitral Tribunal by The Kalyan Janata Sahakari Bank Ltd. for recovery of their loan amount shall be held on the above mentioned address.

You are hereby requested to appear in person or through your legal representative/ Advocate on the given date, time and place before the Arbitral Tribunal. Take a note that, if you or your legal representative/ Advocate fails to appear in person before the Arbitral Tribunal on the day mentioned hereunder, the Application filed by The Kalyan Janata Sahakari Bank Ltd. shall be heard ex-parte.

| Case No. | Name of the Borrower and Guarantor | Details of Credit Facilities | Claim Amt. (Rs.) | Date of Hearing | Time of Hearing |
|---|---|---|---|---|---|
| ARB/KJSB/ SPK/ 93 of 2023 | M/s.Kaytross ACG Life Sciences Ltd. (Borrower) | CDOD / 1 | 42,36,620.02 | 17.06.2023 | 11.30 a.m. |
| | | OMTLN / 1 | 65,53,794.00 | | |

Date:23.05.2023

Sd/-
Adv. Sadanand P. Kulkarni
Arbitrator
For The Kalyan Janata Sahakari Bank Ltd.